# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.नि.वि.वि/६१४/१५/२०१५,
मुंबई - ४०० ०३२,
२८ डिसेंबर २०१५,

परिपत्रक:-

प्राचार्य, सर्व संलग्नित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र व अभियांत्रिकी अनुदानित /विनाअनुदानित महाविद्यालय यांना कळविण्यात येते की, भाषा संचालनालयात मानधन तत्वावर अनुवादाचे काम करण्यास इच्छूक असलेल्या मराठी, इंग्रजी तज्ज्ञाची नामिका (पॅनल) तयार करण्यासंदर्भात मुंबई विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या शैक्षणिक संस्थामधील विविध विषयांतील (प्रशासकिय कायदेविषयक, वैद्यकिय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी) सध्या कार्यरत असलेले किंवा सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांची/अधिव्याख्यात्यांची नावे पाठवणे संदर्भात मा. भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी त्यांच्या क्रमांक - मईअ-२०१५/२५१७/२१३०/चौदा, दि. १/१२/२०१५ अन्वये आवाहन केलेले आहे.

तद्अनुषंगाने प्राचार्य, सर्व संलग्नित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र व अभियांत्रिकी अनुदानित /विनाअनुदानित महाविद्यालय यांच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, विविध विषयांतील (प्रशासकिय कायदेविषयक, वैद्यकिय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी) सध्या कार्यरत असलेले किंवा सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांची/अधिव्याख्यात्यांची नावे यासोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे त्यांची वैयक्तिक माहिती मा. भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय नविन प्रशासकिय इमारत, ५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१, येथे तात्काळ पाठवावी अशी आपणांस विनंती आहे.

मुंबई - ४०० ०३२
२८ डिसेंबर २०१५

प्रा. (डॉ.) अनिल पाटील
संचालक, बि.सि.यु.डी.,
मुंबई विद्यापीठ

प्रत :-

१) सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना.

२) भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, नविन प्रशासकिय इमारत, ५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.

## मानधन तत्वावर काम करण्यास इच्छूक असलेल्या भाषा तज्ञांच्या वैयक्तिक माहितीचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | नाव | |
| २. | पत्ता | |
| ३. | दूरध्वनी/भ्रमणध्वनी व इमेल | |
| ४. | शैक्षणिक अर्हता | |
| ५. | कामाचा अनुभव व पदाचे नाव वेतनश्रेणीसह | |
| ६. | मराठीतून इंग्रजीत केलेल्या अनुवादविषयक विशेष कामाचा तपशील | |
| ७. | शासन विहित करेल त्या दराप्रमाणे काम करण्यास संमती आहे किंवा कसे ? | |

ठिकाण :

दिनांक :

(नाव व स्वाक्षरी)